**शासकीय जमीन**

गायरान जमीन मंजूर करण्याच्या प्रकरणात ग्रामसभेचा ठराव आवश्यक असलेबाबत

# महसूल व वन विभाग

परिपत्रक क्र.जमीन ०८/२००८/प्र.क्र.११३/ज-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २८ मे, २०१०.

**वाचा :** शासन पत्र महसूल व वन विभाग क्र.एलएनडी-४०८१/२०४००/सी.आर. १५३१-जं-५, दिनांक २३ डिसेंबर, १९८८

**परिपत्रक**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५१(१) मधील तरतूदीनुसार ग्रामपंचायतीकडे गुरचरणाच्या प्रयोजनासाठी निहीत झालेली गुरचरण जमीन इतर संस्थेस मंजूर करताना, जमीन देण्यास संमती असल्याबाबतचा संबंधित ग्रामपंचायतीचा संमतीदर्शक ठराव प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार संदर्भीय शासन परिपत्रकान्वये गायरान जमीन एखाद्या संस्थेला मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविताना जिल्हाधिकाऱ्यांनी सदरहू जमिनीच्या वितरणाला संबंधित ग्रामपंचायतीने सहमती दिली आहे किंवा नाही हे प्रथम तपासावे, जमिनीचा आगाऊ ताबा देऊ नये असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. सन २००३ मध्ये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये सुधारणा करण्यात आली असून त्याद्वारे ग्रामसभेच्या अधिकार व कर्तव्याबाबत कलम ८ क.क. (तीन) नव्याने समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार पंचायतीच्या अधिकारातंर्गत येणारी कोणतीही जमीन शासकीय प्रयोजनार्थ संबंधित भूमीसंपादन प्राधिकरणाद्वारे संपादीत करण्याच्या कोणत्याही प्रस्तावासंदर्भात पंचायतीकडून निर्णय घेण्यात येण्यापूर्वी पंचायतीला मत कळविण्याचे अधिकार ग्रामसभेस देण्यात आले आहेत. सदर सुधारणा विचारात घेऊन संदर्भीय दि.२३.१२.१९८८च्या आदेशामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढील आदेश देण्यात येत आहेत.

३. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५१(१) मधील तरतूदीनुसार ग्रामपंचायतीकडे गुरचरणाच्या प्रयोजनासाठी निहीत झालेली गुरचरण जमीन अन्य संस्थेस मंजूर करण्याच्या प्रकरणावर कार्यवाही करताना अथवा मंजूरीचा प्रस्ताव शासनास सादर करताना ग्रामपंचायतीच्या संमतीदर्शक किंवा संमती नसल्याच्या ठरावा सोबत ग्रामसभेचा संमतीदर्शक किंवा संमती नसल्याचा ठराव देखील जोडला असल्याची जिल्हाधिकाऱ्यांनी खात्री करावी.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
आवक नं.
05 JUN 2010
रोटा/एच-१०८३[३००-५-२०१०]-१

15 JUN 2010

[कृ.मा.प.

४. दि.७.३.२००६ चे आदेश व तद्नंतर वेळोवेळी स्वंतत्र आदेशाद्वारे ज्या प्रयोजनासाठी शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रत्यायोजित केलेले आहेत, त्या प्रयोजनासाठी जमिनीचा आगाऊ ताबा देण्यापूर्वी ग्रामसभेचा व ग्रामपंचायतीचा संमतीदर्शक ठराव असल्याची खात्री जिल्हाधिकारी यांनी करावी. मात्र, अपवादात्मक प्रकरणात केंद्र / राज्य शासनाच्या विभागांना / उपक्रमांना महत्वाच्या आणि तातडीच्यां प्रकल्पांसाठी (Projects of vital importance) उदा. पाणीपुरवठा, वीज पुरवठा, संरक्षण व सुरक्षाविषयक बाब, पालीस ठाणे इत्यादीसाठी आगावू ताबा देण्याच्या बाबतीत प्रकरणाचे गांर्भीय व तातडी विचारात घेऊन जिल्हाधिकारी यांनी गुणवत्तेवर निर्णय घ्यावा.

५. हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून लागू होतील.

६. सदर आदेश ग्राम विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शिवाजी गोरे)
कार्यासन आधिकारी

सर्व विभागीय आयुक्त
जमाबंदी आयुक्त व संचालक,भूमि अभिलेख,महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१)मुंबई.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर
मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
पंचायत राज कार्यासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक.
"ज" समुहातील सर्व कार्यासने/उपसचिव/सहसचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई.
**कार्यासन** ज-१, महसूल व वन विभाग निवडनस्ती.

---